**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र विशेष पदयात्रांचं आयोजन
- विदर्भाच्या विकासासाठी शासन वचनबद्ध असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
- जालियनवाला बाग हत्याकांडाला आज १०६ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त देशाची आदरांजली

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू बरोबर होणार

**<><><><><>**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या एक दिवस आधी राज्यासह देशभरात विविध ठिकाणी पदयात्रा काढली जात आहे.

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी आज बिहारमध्ये पटना इथं गांधी मैदानापासून सुरु होणाऱ्या पदयात्रेला त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

आंबेडकर जयंतीनिमित्त युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आज मुंबईत भीम पदयात्रेत सहभागी झाल्या. नरिमन पॉइंट पासून मंत्रालयात आंबेडकर पुतळ्यापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. यावेळी पदयात्रेत हजारो संख्येनं तरुण सहभागी झाले. या पदयात्रेवेळी रक्षा खडसे म्हणाल्या..

**होल्ड.. बाईट - रक्षा खडसे....**

आंबेडकर जयंतीनिमित्त ऐरोलीतल्या बाबासाहेबांच्या ज्ञानस्मारकाला भेट देणारी मोठी जनसंख्या विचारात घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत आवश्यक ते सर्व नियोजन करण्यात आलं आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जय भीम पदयात्रेचं उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झालं. या पदयात्रेत २५० विद्यार्थी स्वयंसेवक आणि विद्यापीठातले कर्मचारी मोठ्या संख्येनं सहभागी झाले.

राज्यात आज सकाळी जिल्हा प्रशासनाच्यावतीनं जय भीम पदयात्रा काढण्यात आली. पथनाट्य आणि परिसंवादासह शाळेत राज्यघटनेची उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. तसंच नांदेड आणि बीड इथंही आज जिल्हा प्रशासन, जिल्हा युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्राच्या समन्वयानं जय भीम पदयात्रा काढण्यात आली.

आंबेडकर जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या पर्यटन संचालनालयानं येत्या १४ आणि १५ एप्रिलला मुंबई, नाशिक आणि नागपूर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीचं आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या हरियाणाला भेट देणार आहेत. सर्वप्रथम ते हिसार ते अयोध्या या नव्यानं सुरू होणाऱ्या विमान उड्डाण सेवेला हिरवा झेंडा दाखवतील आणि हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी करतील. हिसार इथं ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. त्यानंतर, यमुनानगर इथं दीनबंधू छोटूराम औष्णिक वीज केंद्राच्या

८०० मेगावॅट आधुनिक औष्णिक वीज प्रकल्पाची ते पायाभरणी करतील. या प्रकल्पामुळे हरियाणात गावोगावी अखंडित वीजपुरवठा करण्याच्या कामाला चालना मिळणार आहे.  भारतमाला परियोजनेअंतर्गत सुमारे १७० कोटी रुपये किमतीच्या सुमारे साडे चौदा किलोमीटर रेवाडी बाह्य वळणमार्गाचं उद्घाटनही मोदी करतील. यामुळे दिल्ली ते नारनौल प्रवासाचा वेळ सुमारे एक तासाने कमी होईल.

<><><><><>

राज्यात विजेचे दर ५ वर्षांसाठी स्थिर करुन राज्यशासनाने वीज ग्राहकांना दिलासा दिल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. वर्धा जिल्ह्यात आर्वी इथं विविध विकासकामांचं लोकार्पण आज फडणवीस यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. पाणी आणि वीज पुरवठ्याकरता सरकारने हाती घेतलेल्या विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. भूजल पातळी खोल जात असल्यामुळे शेतकऱ्यांना १० अश्वशक्तीचे कृषीपंप वापरण्याची परवानगी देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत सहभागी होण्याचं आवाहन यावेळी त्यांनी केलं. समृद्धी महामार्गामुळे देशव्यापी दळणवळण व्यवस्थेत विदर्भ केंद्रस्थानी आला असून तिथं औद्योगिक विकास करण्यासाठी शासन वचनबद्ध आहे असं ते म्हणाले.

<><><><><>

देशभरात सध्या पोषण पंधरवडा राबवण्यात येत आहे. या अंतर्गत गरोदर तसंच स्तन्यदा माता, आणि बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीनं सकस आहार पुरवण्यावर भर दिला जात आहे. भंडारा जिल्ह्यात महिला आणि बालकल्याण विभाग तसंच जिल्हा आरोग्यविभागाच्या वतीनं या निमित्त

विविध खेळांच्या माध्यमातून पोषक आहाराचं महत्त्व महिला आणि मुलांना समजावून देण्यात आलं. अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून…..

**व्हॉईस कास्ट- पीटीसी - भंडारा..**

**<><><><><>**

जालियनवाला बाग हत्याकांडाला आज १०६ वर्षं पूर्ण होत आहेत. या हत्याकांडात बळी पडलेल्या हुतात्म्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. जालियनवाला बाग मैदानावर भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झालेल्यांना आपण आदरांजली अर्पण करत असून भारताची जनता सदैव त्यांची ऋणी राहील. त्यांच्या प्रेरणेने भारताचा प्रत्येक नागरिक देशाच्या प्रगतीसाठी आपलं योगदान देत राहील, असं मुर्मू आपल्या संदेशात म्हणाल्या आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या शूरांचं अतुलनीय बलिदान कोरलं गेलं असून देश त्यांचा सदैव ऋणी राहील, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी शहिदांना आदरांजली वाहताना म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही जालियनवाला बाग हत्याकांडातल्या शहीदांना आदरांजली वाहिली आहे. जालियनवाला बाग हत्याकांडात शहीद झालेल्यांचं बलिदान स्वातंत्र्य लढ्यातला एक महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांना हे बलिदान सदैव प्रेरणादायी राहील, असं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

१३ एप्रिल १९१९ हा दिवस देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील सर्वांत काळा दिवस असून ही घटना देशाच्या इतिहासातून कधीच पुसली जाऊ शकत नाही. या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या तमाम देशभक्त वीर

हुतात्म्यांना आदरांजली, अशा शब्दांत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आदरांजली वाहिली आहे.

<><><><><>

देशाच्या विविध भागात आज सुगीच्या सणांचा उत्साह दिसत आहे. पंजाबमधे वैशाखी, केरळात विशु, पश्चिम बंगालमधे पोईला बोईशाख आसामात बोहाग बिहू तर तमिळनाडूत पुथंडूच्या रुपाने हे सण साजरे केले जातात. देशाच्या उत्तर भागात वैशाखी उत्साहाने साजरी होत आहे. विशू आणि पुथंडू उद्या साजरे होणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या उत्सवामधून देशाच्या विकासाकरता समर्पणाचा संदेश मिळतो असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. या विविधरंगी उत्सवांमधून भारताची समृद्ध आणि विविधतेने नटलेली कृषीवल संस्कृती दृग्गोचर होते असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. हे उत्सव नवी आशा, आनंद आणि भरभराट आणतात अशा शब्दात प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या चैत्री पौर्णिमा यात्रेस गुढीपाडव्यापासून प्रारंभ झाला आहे. काल चैत्री महिन्याची पौर्णिमा असल्यानं तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची उन्हाच्या कडाक्यातही मोठी गर्दी झाली. सकाळी सहा वाजता अभिषेक-पूजा पार पडली तसंच देवीला धुपारती दाखवून महापूजा करण्यात आली. चैत्री पौर्णिमेनिमित्त देवीच्या गाभाऱ्यात विविध आकर्षक फुलांसह आंब्याची

आरास करून सिंहासनाला आंब्याच्या मोहराची सजावट करण्यात आली होती.

दरम्यान, येरमाळा इथल्या येडेश्वरी यात्रेलाही काल प्रारंभ झाला, आज येडेश्वरी यात्रा महोत्सवातील चुनखडी वेचण्याचा कार्यक्रम आहे, या निमित्ता भाविकांची मोठी गर्दी झाली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू बरोबर जयपूर इथं होणार आहे. दुपारी साडेतीन वाजता खेळ सुरु होईल.

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

आजचा दुसरा सामना दिल्लीत दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता होईल.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठाच्या नावानं बनावट फेसबुक पेजद्वारे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याचं निदर्शनास आलं असून याबाबत सायबर गुन्हे विभागाकडं तक्रार दाखल करण्यात आली आहे. अशा कुठल्याही माध्यमातून मुंबई विद्यापीठ प्रवेश प्रकिया राबवत नाही. या प्रकारातून आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असल्यानं नागरिकांनी सतर्क राहण्याचं आणि अधिकृत संकेतस्थळावर माहितीची खात्री करण्याचं आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**